मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » रविवार, दि. 9 मार्च 2025 | पान- 1

# हवा प्रदूषणाच्या विरोधात सोसायटीधाकरांचा एल्गार!

## सिमेंट मिक्स धुळे मुळे हवा प्रदूषणाचा वाढता धोका : आरोग्याच्या समस्यांमुळे नागरिकांचा मूक मोर्चा

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाकड-ताथवडे परिसरातील २२ हून अधिक गृहनिर्माण सोसायट्यांचे ५०० पेक्षा जास्त रहिवासी आज "हवा प्रदूषण विरोधात एकत्र आले. मूक मोर्चा काढून नागरिकांनी सिमेंट मिक्स धुळ आणि बांधकामाच्या धुळीमुळे वाढलेल्या प्रदूषणाकडे लक्ष वेधले. प्रदूषणाच्या विरोधात आवाज उठवत स्वच्छ व निरोगी पर्यावरण आमचा हक्क असून त्याकडे प्रशासनाने लक्ष केंद्रित करावे अशी ही मागणी नागरिकांनी केली.




वाकड-ताथवडे हौसिंग सोसायटीज फोरम यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा कोहिनूर कोर्टयार्ड वन सोसायटी पासून इंदिरा स्कूल मार्गे वाकडकर चौकापर्यंत नेण्यात आला. या मोर्चात ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुले मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

नागरिकांनी मूक मोर्चा द्वारे पर्यावरण, प्रदूषण, नागरिकांना भेडसावणाऱ्या आरोग्याच्या समस्यांकडे लक्ष वेधले. सिमेंट मिक्स धूळ आणि रस्त्यावरील अवजड वाहनांमुळे होणारे प्रदूषण यामुळे परिसरातील हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली असून श्वसनाचे आजार वाढत आहेत असा मुद्दा यावेळी नागरिकांनी उपस्थित केला.

हवेची गुणवत्ता दररोज घसरत असल्यामुळे परिसरातील लहान मुले, वृद्ध आणि गरोदर महिलांमध्ये दम्याचे, ॲलर्जीचे आणि श्वसनासंबंधी आजारांचे प्रमाण वाढत आहे. याकडे पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि स्थानिक लोकप्रतिनिधींकडे अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

हवेची गुणवत्ता घसरल्यामुळे, प्रदूषण वाढल्याने नैसर्गिक जीवनमानावर परिणाम दिसून येत आहे.सिमेंटच्या धुळीचा थर रस्त्यांवर, गाड्यांवर आणि घरांवर साचत असून नागरिकांचे जीवनमान ढासळत आहे.

### नागरिकांच्या प्रमुख मागण्या..

- सिमेंट मिक्स धूळ त्वरित बंद व्हावी.
- वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक नियम आणि उपाययोजना लागू कराव्यात.
- वायू प्रदूषण पातळीची नियमित तपासणी करून अहवाल सार्वजनिक करावा.
- रस्त्यांची नियमित २ वेळा साफसफाई करून धुळीचे प्रमाण कमी करावे.
- नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनावर कठोर कारवाई केली जावी.
- स्त्यांवरील धूळ कमी करण्यासाठी टँकरद्वारे, एअर गन द्वारे नियमितपणे पाण्याचा फवारा मारला जावा.
- प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करून आवश्यक ती आरोग्यसेवा पुरवावी.
- रस्त्यांवरील झाडांची देखभाल आणि पाणी नियमित करावे.

# चऱ्होलीच्या शहरीकरणावर डाक विभागाचा 'स्टँम्प'

## नवीन डाक उप विभागीय कार्यालियाचे लोकार्पण : आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत 1997 मध्ये समाविष्ट झालेल्या चऱ्होली आणि परिसराच्या शहरीकरणावर आणि डेव्लपमेंटवर अखेर भारतीय डाक विभागाने शिक्कामोर्तब केले आहे. चऱ्होलीला ग्रामीण ऐवजी आता शहरी 'पिन कोड' मिळाला आहे.

वाढते शहरीकरण आणि औद्योगिकीकरण यामुळे चऱ्होली येथे असलेल्या शाखा डाक घरामार्फत देण्यात येणाऱ्या पोस्टाच्या सेवांवर अतिरिक्त ताण येत होता. या पार्श्वभूमीवर चऱ्होलीला शहरी पिन कोड मिळावा आणि डाक उप कार्यालय सुरू करण्याचा निर्णय डाक विभागाने घेतला. त्यासाठी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी पाठपुरावा केला. त्याला यश मिळाले आणि आज डाक कार्यालयाचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी माजी महापौर नितीन काळजे, पुणे क्षेत्राचे पोस्टमास्टर जनरल रामचंद्र जायभाये आणि पुणे ग्रामीण डाक विभागाचे अधीक्षक बाळकृष्ण एरंडे उपस्थित होते. सहायक अधीक्षक डाकघर जुन्नर उपविभाग भूषण देशमुख, सहाय्यक अधीक्षक वेस्ट सब डिव्हिजन मुन्ना कुमार, निरिक्षक डाकघर खेड उपविभाग मारुती मेढे, तक्रार निरीक्षक पुणे ग्रामीण विभाग लक्ष्मण शेवाळे व चऱ्होली परिसरतील नागरिक उपस्थित होते.



आमदार महेश लांडगे यांनी चऱ्होली शाखा डाकघराचे उपडाकघरात रूपांतर करण्याचा प्रस्ताव डाक विभागाला सादर केला होता. सदर प्रस्ताव मंजूर झाला आणि जागतिक महिला दिनाच्या मुहूर्तावर नवीन चऱ्होली उपडाकघराचे उद्घाटन करण्यात आले. डिलिव्हरी उपडाकघराचा दर्जा मिळाल्यानंतर आता चऱ्होली ला स्वतंत्र 411081 हा पिनकोड प्राप्त झाला आहे.

### डाक मेळाव्याला ग्रामस्थांचा प्रतिसाद...

» यावेळी प्राताविक करताना पुणे ग्रामीण डाक विभागाचे अधीक्षक बाळकृष्ण एरंडे यांनी डाक विभागाच्या सर्व बचत योजना, आधार कार्ड अध्यतन सेवा, डाक विमा योजना,अपघाती विमा योजना तसेच पार्सल पाठवण्याची सुविधा या सेवांचा लाभ चऱ्होली उपडाकघरामार्फत ग्रामस्थांना घेता येणार असल्याचे मनोगत व्यक्त केले. चऱ्होली उपडाकाघराचे प्रथम उपडाकपाल म्हणून बबन ढेरंगे यांची नियुक्ती केली आहे. यावेळी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिला विमा प्रतिनिधी व महिला कर्मचारी यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच आज डाक मेळावा याचे पण आयोजन करण्यात आले होते.

# महिला दिनानिमित्त पोलिसांकडून दुचाकी रॅली

## 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'चा दिला संदेश : महिला पोलिसांना पुष्पगुच्छ देऊन महिला दिनाच्या शुभेच्छा

**पुणे | प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त शहर पोलिसांकडून दहा मार्चपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत परिमंडळ एकच्या कार्यक्षेत्रातील महिला पोलिस अधिकारी आणि अंमलदारांनी शुक्रवारी दुचाकी रॅली काढून 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' चा संदेश दिला.

पोलिस उपायुक्त संदीपसिंग गिल यांच्या उपस्थितीत शनिवारवाडा येथून दुचाकी रॅलीचा प्रारंभ झाला. छत्रपती शिवाजी महाराज रस्त्याने बुधवार चौक, बेलबाग चौक, लक्ष्मी रस्त्याने सेवासदन, लोकमान्य टिळक चौक, खंडोजी बाबा चौक, गुडलक चौक फर्ग्युसन महाविद्यालय रस्त्याने मॉडर्न महाविद्यालयमार्गे काढण्यात आलेल्या रॅलीचा बालगंधर्व चौकात समारोप झाला. रॅलीच्या समारोपप्रसंगी पोलिस आयुक्त अमितेश कुमार उपस्थित होते. त्यांनी रॅलीतील महिला पोलिसांना पुष्पगुच्छ देऊन महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

अतिरिक्त पोलिस आयुक्त प्रवीणकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपायुक्त संदीपसिंग गिल, सहाय्यक आयुक्त अनुजा देशमाने, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयमाला पवार, गिरीषा निंबाळकर, शर्मिला सुतार यांनी रॅलीचे नियोजन केले.



# पिंपरीत पहिल्या वाहनमुक्त दिनाचे मोठ्या उत्साहात उद्घाटन

## दोन दिवस झुंबा, लाईव्ह संगीत, सायकलींग, पथनाट्य, नृत्यप्रदर्शन यांसारख्या विविध कार्यक्रमांचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

दिवसेंदिवस शहरातील वाहनांची संख्या वाढत आहे, त्यामुळे वाहतुकीच्या समस्या निर्माण होत आहेत. तसेच पर्यावरणाला हानी पोहचत आहे.शहरात खरेदीसाठी बाहेर पडणाऱ्या पादचारी नागरिकांना देखील वाहतूक समस्या भेडसावत असते,या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने नियोजन करून शहरात प्रथमच गजबजलेल्या पिंपरी बाजारपेठेत वाहन मुक्त दिवसाचे आयोजन करून स्तुत्य उपक्रम राबविला आहे तसाच उपक्रम शहरातील इतर ठिकाणीही राबववा असे प्रतिपादन खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ८ व ९ मार्च २०२५ रोजी सकाळी ८ ते रात्री ९ वाजेपर्यंत पिंपरी बाजार परिसरात (साई चौक ते शगून चौक आणि शगून चौक ते महर्षी वाल्मिकी चौक) अशा अनोख्या प्रकारच्या पहिला वाहन-मुक्त दिवसाचे उद्घाटन खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे



यांच्या हस्ते झाले त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

आयोजित पहिल्या वाहन-मुक्त दिनात पुढील दोन दिवस चालणा-या या उपक्रमात झुंबा, लाईव्ह संगीत, सायकलींग, पथनाट्य, नृत्यप्रदर्शन, खेळ यांसारख्या विविध कार्यक्रमांचे आयोजन आले आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना दोन दिवस पिंपरी बाजारात वाहन मुक्त वातावरणात खरेदीचा आनंद घेता येणार आहे तसेच लहान मुलांना विविध खेळणी प्रकारांचा, सर्वासाठी विविध खाद्यपदार्थाचा, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचा देखील उपक्रमात समावेश आहे.

या प्रसंगी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, माजी नगरसदस्य डब्बू आसवानी, संदीप वाघेरे, माजी नगरसदस्या निकीता कदम, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता बापू गायकवाड, उप आयुक्त सिताराम बहुरे, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननावरे, कार्यकारी अभियंता प्रेरणा सिनकर आणि सहकारी यांच्यासह स्थानिक व्यापारी व दुकानदार, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते तसेच महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना खासदार श्रीरंग बारणे म्हणले की, यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा पहिला 'वाहन मुक्त दिन' हा एक स्तुत्य उपक्रम ठरणार आहे. यामुळे आज ज्या पिंपरी मार्केट मधील रस्त्यावर चालता येत नव्हते त्या रस्त्यांवर आज लहान मुले खेळ खेळताना दिसत आहेत. या माध्यमातून पादचारी नागरिकांना चालण्यासाठी चांगले

### उपक्रमाचे मुख्य आकर्षण..

» "चाय पे चर्चा" या कार्यक्रमात माजी नगरसेवक,पोलीस अधिकारी व नागरिक थेट साधतील संवाद.
» सार्वजनिक वाहतूकीस चालना देण्यासाठी नागरिकांमध्ये करण्यात येणार जनजागृती.
» चारचाकी, दुचाकी आणि इतर वाहनांसाठी पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था यासारख्या उपक्रमांचा समावेश असल्याची माहिती अतिरिक्त आयुक् प्रदीप जांभळे पाटील यांनी दिली आहे.

मार्ग उपलब्ध होणार आहेत. याबद्दल महापालिका प्रशासन कौतुकास पात्र आहे. देशभरात विविध शहरांमध्ये वाहतूक समस्या सोडविण्यासाठी व नागरिकांना रस्तांवर चालताना अडचणी येऊ नये म्हणून वाहन मुक्त दिन साजरा केला जात आहे.

वाहन-मुक्त दिनानिमित्त संपूर्ण पिंपरी बाजारपेठ क्षेत्र सुशोभित करण्यात आले आहे. या वाहनमुक्त दिवसाचा मुख्य उद्देश नागरिकांना मोकळ्या रस्त्यांचा आनंद घेण्यास संधी देणे आहे, जिथे ते चालू शकतील आणि बाजार परिसराचा आनंद घेऊ शकतील. यासोबतच हा उपक्रम पिंपरी बाजारपेठेत पादचाऱ्यांसाठी आणि सायकलस्वारांसाठी पूरक वातावरण निर्मिती करणे, पर्यावरणाचे संतुलन राखणे आणि प्रदूषण मुक्तीसाठी जनजागृती करणे यासाठी उपयुक्त ठरणार आहे. यामध्ये सातत्य ठेऊन असे उपक्रम आयोजित करून नागरिकांचा पर्यावरण पूरक उपक्रमात सहभाग वाढविणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. याशिवाय या उपक्रमाद्वारे नागरिक व विक्रेत्यांच्या,व्यावसायिकांच्या प्रतिक्रिया, सर्वेक्षण व चर्चाद्वारे भविष्यातील आराखडा तयार केला जाणार आहे. त्यासाठीही सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी केले आहे.

# महापालिकेच्या कर संकलन विभागासमोर वसुलीचे आव्हान

## 200 कोटी रुपयांचे टार्गेट; मालमत्ता जप्त करून त्या सील करण्याची कारवाई तीव्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागाकडून आत्तापर्यंत तब्बल 800 कोटींचा मालमत्ताकर वसूल करण्यात आला आहे. या विभागास 1 हजार कोटी रुपयांचे टार्गेट आहे. येत्या 31 मार्चपर्यंत म्हणजे केवळ 26 दिवसांत 200 कोटी रुपये वसुलीचे आव्हान या विभागासमोर आहे.

कर संकलन विभागाने मोठ्या थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करून त्या सील करण्याची कारवाई तीव्र केली आहे. प्रतिसाद न देणाऱ्या थकबाकीदारांची नावे वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहेत. त्या मालमत्तांची लिलाव प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. थकबाकीदार कंपन्या, कारखाने, शॉपींग मॉल, पेट्रोल पंप, रुग्णालय, शाळा, महाविद्यालय, बांधकाम व्यावसायिक, हॉटेल तसेच, निवासी मालमत्ता सील केल्या आहेत. कारवाईनंतर थकबाकीदार बिल भरत आहेत. त्या मालमत्तेचे सील काढण्यात येत आहे. तसेच, 50 हजार व त्या पेक्षा अधिक थकबाकी असलेल्या निवासी व बिगरनिवासी मालमत्तांकडून वसुली मोहिम तीव्र करण्यात आली आहे. तसेच, नळजोडही खंडीत करण्यात आले आहेत. एसएमएस आणि फोन करून थकबाकीदारांना बिल भरण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. त्याला काही मालमत्ताधारकांकडून प्रतिसाद मिळत आहे.

आत्तापर्यंत एकूण 4 लाख 78 हजार 658 मालमत्ताधारकांनी एकूण 797 कोटी 19 लाख 38 हजार 926 रूपयांचा भरणा केला आहे. कर संकलन विभागास 1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 या आर्थिक वर्षात 1 हजार कोटी रुपये वसुलीचे टार्गेट आहे. त्यामुळे उर्वरित 26 दिवसांत त्या विभागास तब्बल 200 कोटी रूपयांची वसुलीसाठी कारवाई मोहिम तीव्र करावी लागणार आहे. त्या दृष्टीने विभागाने नियोजन केले असून, अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना वसुलीचे टार्गेट दिले आहे. एक हजार कोटींचे टार्गेट कर संकलन विभाग पूर्ण करणार का, याची उत्सुकता लागली आहे.




### ऑनलाईनने सर्वाधिक 551 कोटी 71 लाख भरणा

» मालमत्ताकराची बिले ऑनलाईन भरण्यास गेल्या दहा वर्षांपासून प्रतिसाद वाढत आहे. स्मार्ट मोबाईल तसेच, इंटरनेटमुळे ती संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ऑनलाईन तसेच, ईडीसी, एनईएफटी, आरटीजीएस, आयएमपीएस या माध्यमातून एकूण 551 कोटी 71 लाख रूपयांचा भरणा मालमत्ताधारकांनी केला आहे. तर, रोखीने 81 कोटी 43 लाख रूपये जमा झाले आहेत. धनादेशाद्वारे 102 कोटी 13 लाख आणि डीडीद्वारे 5 कोटी 43 लाख रूपये कर संकलन विभागाकडे जमा झाले आहेत.

### करवसुली मोहीम तीव्र

» थकबाकीदारांकडून थकबाकीसह संपूर्ण मालमत्ताकर वसुलीसाठी कारवाई मोहिम तीव्र करण्यात आली आहे. तसेच, 877 मालमत्ता सील केल्या आहेत. त्यापैकी 438 थकबाकीदारांची नावे वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहेत. त्यातील काही जणांनी बिलाचा भरणा केला आहे. उर्वरित थकबाकीदारांना बुधवार (दि.5) पर्यंत मुदत दिली होती. मुदतीमध्ये थकीत बिल न भरल्यास त्या मालमत्तांचा लिलाव केला जाणार आहे. तसेच, इतर थकबाकीदारांकडून वसुली केली जात आहे, असे कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.

### कुदळवाडीतील कारवाईमुळे तोटा ?

» कुदळवाडीतील तब्बल 4 हजार 111 अनधिकृत बांधकामे व पत्राशेडवर महापालिकेने कारवाई करीत ते जमीनदोस्त केले आहेत. त्यामुळे कर संकलन विभागाचे तब्बल 60 कोटी रूपयांचा मालमत्ताकर बुडाल्याचा अंदाज आहे. तसेच, तळवडे, वाकड आणि इतर परिसरात महापालिकेकडून कारवाई सुरू आहे. त्यामुळे मालमत्ताकर बुडाला आहे. वसुलीवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. दुसरीकडे ड्रोनद्वारे केलेल्या सर्वेक्षणात तब्बल 2 लाख 50 हजारांपेक्षा अधिक नवीन मालमत्ता सापडल्या आहेत. त्यामुळे महापालिकेचा मालमत्ताकर 250 कोटींपेक्षा अधिकने वाढणार आहे.

# एकेरी वाहतुकीमुळे चाकण औद्योगिक वसाहतीतील कोंडी कमी; उद्योगमंत्री उदय सामंत यांचा दावा

## 'चाकण औद्योगिक वसाहतीमधील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी काही भागांत एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

चाकण औद्योगिक वसाहतीमधील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी काही भागांत एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. कोंडी कमी होण्यासाठी टप्पा क्रमांक एक ते चारमधील कंपन्यांमधील कामकाज सुरू होण्याच्या आणि संपण्याच्या वेळेत १५ मिनिटांचे अंतर ठेवण्यात आले आहे. त्यामुळे वाहतूक समस्या कमी होण्यास काही प्रमाणात मदत झाल्याचा दावा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केला.

भाजपचे आमदार श्रीकांत भारतीय यांनी विधान परिषदेत चाकण औद्योगिक वसाहतीमधील वाहतूककोंडीबाबत तारांकित प्रश्न विचारला होता. चाकण येथील वाहतूककोंडीची समस्या सोडविण्यासाठी उपमुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत दिलेल्या सूचना, उपाययोजनांची अंमलबजावणी झाली आहे का, शासनाकडून कोणती कार्यवाही, उपाययोजना केल्या जात आहेत, अशी विचारणा केली.

उद्योगमंत्री सामंत यांनी लेखी उत्तर दिले आहे. 'पिंपरी-चिंचवड पोलिसांसह संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर प्रत्यक्ष पाहणी केली. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत विविध उपाय योजना हाती घेतल्या आहेत. चाकण टप्पा क्रमांक तीनमधील रस्त्यावरील पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी आवश्यक तेथे सिमेंट काँक्रीट पाइप टाकण्यात आले आहेत. टप्पा क्रमांक एक ते चारमधील कंपन्यांमधील कामकाज सुरू होण्याच्या व संपण्याच्या वेळेत १५ मिनिटांचे अंतर ठेवण्यात आले आहे. टप्पा क्रमांक तीनमधील विद्युत वितरण कंपनीच्या उच्चदाब वाहिनीखाली साहित्य, माल घेऊन आलेल्या अवजड वाहनांच्या वाहनतळासाठी जागा उपलब्ध होण्यासाठी महापारेषणकडे अभिप्राय मागविण्यात आला आहे.

कंपन्यांच्या भूखंडामधून वाहून येणारे पावसाचे पाणी रस्त्यावर न येण्यासाठी ते पाणी गटारात सोडण्याची व्यवस्था करण्याबाबत संबंधित कंपन्यांना निर्देश देण्यात आले आहेत. एमआयडीसीच्या हद्दीतील पावसाळे नाले गाळमुक्त करण्यात आले आहेत. एकेरी वाहतुकीमुळे काही प्रमाणात कोंडी कमी झाली आहे. परंतु, पुणे-नाशिक महामार्ग, चाकण-तळेगाव, चाकण-शिक्रापूर या मार्गावर होणाऱ्या वाहतूककोंडीमुळे येथील उद्योगांचा श्वास कोंडला आहे. यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत, अशी मागणी फेडरेशन ऑफ चाकण इंडस्ट्रीजचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप बटवाल यांनी केली.



### वाहतूक सुरळीत होण्यास मदत

» कंपन्यांच्या भूखंडामधून वाहून येणारे पावसाचे पाणी रस्त्यावर न येण्यासाठी ते पाणी गटारात सोडण्याची व्यवस्था करण्याबाबत संबंधित कंपन्यांना निर्देश देण्यात आले आहेत. एमआयडीसीच्या हद्दीतील पावसाळे नाले गाळमुक्त करण्यात आले आहेत. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होईल. कंपन्यांच्या बस त्यांच्याच भूखंडामध्ये उभ्या करण्याच्या सूचना दिल्या आहेत. एमआयडीसीच्या क्षेत्राच्या रस्त्यावरील खड्डे दुरुस्त करण्यात येत असल्याने वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली असल्याचे सामंत यांनी सांगितले.

# दस्त नोंदणीच्या कामातही 'महिलाराज'

## जागतिक महिला दिनाच्यानिमित्ताने शहर आणि परिसरातील 27 दस्त नोंदणी कार्यालयांची संपूर्ण जबाबदारी महिलांनी समर्थपणे सांभाळली.

**पुणे | प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाच्यानिमित्ताने शहर आणि परिसरातील २७ दस्त नोंदणी कार्यालयांची संपूर्ण जबाबदारी शुक्रवारी महिलांनी समर्थपणे सांभाळली. दस्त नोंदणीसारखे आव्हानात्मक काम लिलया पूर्ण करत महिला अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दिवसभरात १२७० दस्तांची नोंदणी केली. विशेष म्हणजे सात महिलांनी प्रथमच या पदाचे कार्यभार स्वीकारतानाच काही महिला अधिकारी बाळाच्या संगोपनाच्या रजेवर असतानाही कर्तव्यावर हजर झाल्या.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने नारी शक्तीचा सन्मान करण्यासाठी शहरातील २७ दस्त नोंदणी कार्यालयांची जबाबदारी महिला अधिकाऱ्यांकडे देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यानिमित्ताने शहरातील सर्व हवेली क्रमांक एक ते २७ कार्यालयांची जबाबदारी महिला अधिकाऱ्यांकडे देण्यात आली. यापैकी दहा कार्यालयांकडील पदभार महिला अधिकाऱ्यांकडेच असल्याने उर्वरित १७ कार्यालयांचे पदभार या उपक्रमाच्या निमित्ताने महिलांकडे देण्यात आले. शहरातील सर्व कार्यालयांची दररोजची सरासरी दस्त संख्या १ हजार ३०० एवढी असते. या उपक्रमाच्या निमित्ताने महिलांनीही गतीने काम करत दिवसभरात १ हजार २३० दस्तांची नोंदणी करत महिलांची कार्यक्षमता दाखवून दिली. त्यांच्या या कामाचे कौतुक वकील, बांधकाम व्यावसायिक आणि पक्षकारांकडून करण्यात आले.

सात महिलांनी प्रथमच या पदाचा स्वीकारेलला कार्यभार, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. प्रियंका मसलखांब या अधिकारी त्यांच्या लहान बाळाच्या संगोपनाच्या रजेवर असतानाही त्या उपक्रमाच्या निमित्ताने कर्तव्यावर हजर झाल्या आणि हवेली क्रमांक १२ च्या कार्यालयाचा कार्यभार चिमुकल्या बाळाला कुशीमध्ये घेऊन सांभाळला. शारदा देशमुख आणि संगीता नीलपत्रेवार या गरोदर कर्मचाऱ्यांनी हवेली क्रमांक १८ आणि अन्य एक कार्यालयाचे कामकाज पाहिले. सुप्रिया कुंभार यांनी हवेली क्रमांक २१ कार्यालयाचा कार्यभार दुपारपर्यंत तर, नंतर हवेली क्रमांक २२ या कार्यालयाचा कार्यभार संध्याकाळपर्यंत सांभाळला. सह जिल्हा निबंधक वर्ग १ पदाची जबाबदारी संगीता फाटारे, सह जिल्हा निबंधक वर्ग २ ची जबाबदारी राजश्री खटके यांनी पाहिली.





### पहिल्यांदाच सांभाळला 'त्या' सात जणींनी स्वतंत्र कारभार

» शुक्रवारी सात महिला कर्मचाऱ्यांनी प्रथमच या पदाचा कार्यभार सांभाळला. शारदा देशमुख, संगीता निलपत्रेवार या गरोदर कर्मचाऱ्यांनी हवेली क्र. 18 आणि 1 या कार्यालयाचा कार्यभार सांभाळले. तसेच सुप्रिया कुंभार यांनी हवेली क्र. 21 या कार्यालयाचा कार्यभार दुपारपर्यंत सांभाळून नंतर हवेली क्रमांक 22 या कार्यालयाचा कार्यभार संध्याकाळपर्यंत सांभाळला. सह जिल्हा निबंधक वर्ग 1 या पदाचा कार्यभार संगीता पाठारे यांनी,तर सह जिल्हा निबंधक वर्ग 2 या पदाचा कार्यभार राजश्री खटके यांनी सांभाळला. दुय्यम सहनिबंधक कार्यालयाच्या या अनोख्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### हाती 27 दस्तनोंदणी कार्यालयांच्या कारभाराची दोरी

» शहरातील सर्व सहदुय्यम निबंधक कार्यालये (हवेली क्र.1 ते 27) कार्यालयांचे कार्यभार महिला अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला होता. यापैकी 10 कार्यालयांचा पदभार महिला अधिकाऱ्यांच्या हाती आहे. महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर 17 कार्यालयांचा कार्यभारही महिला अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आला होता. हे आव्हान समर्थपणे पेलवत नारीशक्तीने दिवसभरात 1 हजार 270 दस्तांची नोंदणी केली.

### महिला कर्मचारी-अधिकाऱ्याचा सन्मान

» शहरातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयातील प्रभारी दुय्यम निबंधक कार्यालयातील महिला शिपाई व संगणक परिचालक यांचा त्या-त्या कार्यालयात जाऊन सह जिल्हा निबंधक कार्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

# दौंड ते लोणावळा लोकल सुरु करा, उरुळी कांचन ग्रामस्थांचे खासदार सुप्रिया सुळेंना निवेदन

## कोरेगाव मूळ (ता. हवेली) येथे पुरंदर उपसा जलसिंचन योजनेच्या जॅकवेलची पाहणी करण्याकरिता खासदार सुप्रिया सुळे आल्या होत्या.

**पुणे | प्रतिनिधी**

उरुळी रेल्वे स्टेशनवर लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्यांना थांबा देण्यात यावा. तसेच मागील पाच वर्षांहून अधिक काळ झाला तरी लोणावळा – दौंड लोकल सुरू झाली नाही. ती या एप्रिलपासून सुरू करावी, अशा मागण्यांचे निवेदन बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांना देण्यात आले आहे.

कोरेगाव मूळ (ता. हवेली) येथे पुरंदर उपसा जलसिंचन योजनेच्या जॅकवेलची पाहणी करण्याकरिता खासदार सुप्रिया सुळे आल्या होत्या. यावेळी उरुळी कांचन शहर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), उरुळी कांचन प्रवासी संघ व उरुळी कांचन ग्रामस्थांच्या वतीने हे निवेदन देण्यात आले आहे. यावेळी माजी आमदार अशोक पवार, रामभाऊ तुपे, प्रवासी संघाचे अध्यक्ष प्रकाश जगताप, माजी सरपंच भाऊसाहेब कांचन, युवकाध्यक्ष आप्पासाहेब वाघमोडे, यशवंतचे माजी संचालक श्रीहरी कोतवाल यांचेसह अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षांपासून प्रवासी संघटनेच्या कामगारांच्या व ग्रामस्थांच्या माध्यमातून शिरूर हवेलीच्या लोकप्रतिनिधींकडे उरुळी रेल्वे स्टेशनवर कामगारांच्या, विद्यार्थ्यांच्या, व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी लांब पल्ल्यांच्या रेल्वे गाड्यांना थांबा देण्याची मागणी केली जात आहे. पुणे-दौंड लोहमार्गाला उपनगरीय रेल्वे लोहमार्गाचा दर्जा द्यावा. त्यामुळे लोणावळा – दौंड लोकल सुरु करणे हितावह होईल, अशा मागण्या सातत्याने करून देखील, लोकसभेमध्ये या भागाचे प्रतिनिधित्व करत असलेल्या खासदारांना या मागण्यांचा पाठपुरावा करून तो सोडवण्यासाठी वेळ मिळाला आहे किंवा नाही का त्यांची याबाबत मानसिकताच नाही हे समजणे अवघड झाले आहे.



### खासदारांवर नाराजी

» आमच्या मागण्याच हे लोकप्रतिनिधी पुढे रेटत नसतील तर त्या मंजूर कशा होणार? यावरुनच त्यांची सर्वसामान्य जनतेप्रती असलेली आस्ता समजून येत आहे. ते जर आपल्या मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेच्या महत्त्वाच्या मागण्या लोकप्रतिनिधी या नात्याने केंद्र सरकारकडून सोडवून घेण्यासाठी अपयशी ठरत असतील तर अशा लोकप्रतिनिधींनी खासदारकीची जागा अडवू नये, अशा प्रकारची भूमिका या परिसरातील जेष्ठ, बुजुर्ग व सर्वसामान्य जनता व्यक्त करीत आहे.

> उरुळी कांचन भागातून वाढणारी प्रवासी संख्या विचारात घेता या ठिकाणी लोकल रेल्वे सेवा उपलब्ध होणे काळाची गरज आहे. शहराजवळील भागाला उपनगरीय सेवा देऊन उपनगरांचे कनेक्टिंग वाढविले आहे. पुणे विभागाने पुणे ते दौंड उपनगरीय सेवा उपलब्ध करण्याचे पाऊल उचलले पाहिजे. उरुळी कांचन व दौंड भागाकडे वाढणारे नागरीकरण पाहता ही सेवा रेल्वेने जलदगतीने उपलब्ध करावी.
>
> - प्रकाश जगताप, अध्यक्ष उरुळी कांचन प्रवासी संघ